बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३६१ । वार सोमवार दि २२ सप्टेंबर एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 361 Monday 21 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# बेडसकराला पकडण्यासाठी दोन पोलीस पथक तयार केले हे खरं पण, पोलीस निरीक्षक उनवणे यांनी त्याचवेळी पोलीस स्टेशनमधून सोडून का दिला होता?

### बाललैंगिक प्रकरणातील आरोपी लक्ष्मण बेडसकरच्या मोबाईल डेटा आणि कारनाम्यांची तातडीने चौकशी व्हावी?

बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागाला कलंक लावणारा गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर बाललैंगिक प्रकरणातील आरोपी असून, त्याच्या मोबाईलमध्ये असलेला डेटा आणि कारनामे तपासणीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. तपासी अधिकाऱ्यांनी आरोपीचा मोबाईल डेटा पूर्णपणे तपासून न्यायालयासमोर सादर करावा. मोबाईलमध्ये सापडलेले सर्व संवाद, कॉल, मेसेजेस व इतर पुरावे न्यायालयासमोर मांडले जावेत. आरोपीने किती महिलांना व मुलींना फसवले, याचे सत्य न्यायालयासमोर स्पष्ट व्हावे. यामुळे असे आरोपी भविष्यात मोठा गुन्हा करणार नाहीत, हे सुनिश्चित करता येईल. जर आरोपी पैशाच्या जोरावर काही गैरवर्तन करत असेल, तर तपासणी अधिकारी कडक कारवाई करावी. यामुळे पोलीस प्रशासनावरील जनतेचा विश्वास वाढेल.

सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४



# लक्ष्मण बेडसकरसारखे नराधम जर पोलिसांच्या छत्रीत मोकाट फिरत राहिले, तर लोकांचा संताप रस्त्यावर फुटणार हे मात्र नक्की?

## साधा गुन्हेगार २४ तासांत तुरुंगात, पण शैक्षणिक क्षेत्राचा नराधम का वाचला, पोलीस प्रशासनाने जनतेला उत्तर द्यावं?






- **नराधम बेडसकरला अटक करण्याचे एसपी नवनीत कॉवत व संबंधित डीवायएसपी ऋषिकेश शिंदे यांच्यासमोर मोठे आवाहन?**
- **बेडसकरने आतापर्यंत किती शिक्षिका, विधवा व खाजगी महिलांना पैसा व नोकरीचे आमिष दाखवून जाळ्यात अडकवले, सीडीआर बाहेर काढल्याशिवाय हे जाळे उघड होणार नाही?**
- **आरोपी बेडसकरला तात्काळ बेड्या ठोकून, सीडीआर तपास करून संपूर्ण जाळे बाहेर काढा आणि त्या महिलांचे जबाब नोंदवा?**
- **लक्ष्मण बेडसकर राजकीय छत्रीमुळे आधीही वाचला, पण आता पापाचा घडा फुटला; महिलांसोबतचे अनेक कॉल रेकॉर्डिंग्स व्हायरल?**

### गुन्हा दाखल होत असताना आरोपी ठाणे अंमलदाराच्या टेबलवर बसून काय करत होता? पोलिसांची चौकशी होणार का?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर याच्यावर विनयभंग व पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला. मात्र गुन्हा नोंदविण्याच्या वेळेस आरोपी बेडसकर ठाणे अंमलदाराच्या टेबलावर थाटामाटात बसून काय करत होता का तिथे बसून मॅनेजमेंट करत होता, असा धक्कादायक आरोप समोर येतो आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतरही या नराधमाला पोलीस स्टेशनमधून पसार होण्यास कोणी मदत केली, हा प्रश्न आता जनतेत तीव्र चर्चेचा विषय ठरला आहे. स्वतःवर गंभीर गुन्हा दाखल होत असताना आरोपी ठाण्यात थाटात का बसवला होता? तसेच गुन्हा नोंदवल्यानंतर तो पोलीस स्टेशनमधून कसा पळाला? त्याला पसार होण्यासाठी कोणत्या पोलिसांनी मदत केली? या प्रकरणात अधिकाऱ्यांचा हातभार होता का? त्याला पोलीस स्टेशनमधून मोकळा सोडणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांची चौकशी झालीच पाहिजे, अशी जोरदार मागणी होत आहे.

### पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि डीवायएसपी ऋषिकेश शिंदे यांना याची माहिती आहे का?

केज पोलीस ठाण्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब केज पोलीसांवर जनतेत चर्चेचा विषय बनलेला आहे की, विनयभंग व पोस्को प्रकरणातील आरोपी बेडसकरला अटक का झाली नाही? आरोपी बेडसकरला अटक करण्यासाठी पोलीसांनी दोन पथक तयार केले आहेत. पण पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी थेट पोलीस स्टेशनमध्ये आलेल्या आरोपीला सोडून का दिले. याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि केजच्या डीवायएसपी ऋषिकेश शिंदे यांना आहे का? सामान्य गुन्हेगार ठाण्यात आल्यावर २४ तासांत तुरुंगात ठेवले जातात, पण शैक्षणिक क्षेत्रातील हद्दभंग करणाऱ्या आरोपीला का वाचवले गेले, याचे उत्तर जनतेला कोण देणार, असा मोठा सवाल उपस्थित झाला आहे. याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी पोलीस कारभारावर कठोर मागणी सुरू केली आहे, तसेच सामाजिक माध्यमांवर देखील प्रचंड प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागाला गालबोट लावणारा कुख्यात गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर याच्यावर विनयभंग व पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेला असतानाही, अद्याप तो मोकाट फिरत आहे. याच्यावर आरोप आहे की, गेल्या अनेक वर्षांत या नराधमाने कित्येक मुली व महिलांचे संसार उद्ध्वस्त केले. त्याचे अनेक महिलांसोबतचे संभाषणाचे कॉल रेकॉर्डिंग्स व्हायरल झाल्याने खळबळ माजली आहे. हा प्रकार पहिलाच नसून, यापूर्वीही अनेक तक्रारी झाल्या होत्या, पण राजकीय नेत्यांची सावली असल्याने प्रत्येक वेळी तो वाचत राहिला. मात्र अखेर पापाचा घडा भरला आणि सत्य बाहेर आले. हा नराधम आरोपी गेल्या कित्येक वर्षांपासून महिलांचे संसार उद्ध्वस्त करत आला आहे, असा गंभीर आरोप समाजात चर्चिला जात आहे. पोलीस प्रशासनाने बेडसकरचा सिडीआर काढून चौकशी केली तर त्याने किती महिलांना त्रास दिला याचे संपूर्ण चित्र बाहेर येईल. बेडसकरवर असा आरोप होत आहेत की, त्याने सोळा वर्षांखालील मुली, काही शिक्षिका, विधवा महिला, खाजगी महिला व नोकरीच्या शोधात असलेल्या युवतींना आपल्या जाळ्यात ओढले. पैसा व नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्यावर शारीरिक, मानसिक व सामाजिक अत्याचार केले.

त्याचे अनेक महिलांसोबतचे संभाषणाचे कॉल रेकॉर्डिंग्स आता व्हायरल झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. बेडसकरविरोधात यापूर्वीही तक्रारी झाल्या होत्या, परंतु राजकीय छत्रछाया व काही भ्रष्ट अधिकार्यांचे संरक्षण मिळाल्याने प्रत्येक वेळी तो वाचत राहिला. आजवर त्याने कित्येक मुली व महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त केले आहे, ही बाब जिल्ह्यात सर्वत्र चर्चेत आहे. सत्य बाहेर काढण्यासाठी पोलीस प्रशासनाने बेडसकरचा कॉल सीडीआर तातडीने तपासावा अशी मागणी होत आहे. कारण त्याने कोणकोणत्या महिलांशी संपर्क साधला? त्या महिला कोण आहेत? त्या महिलांचे व– आरोपीचे संबंध कशा प्रकारचे होते? त्या महिला कोणत्या व्यवसायात आहेत? ही सर्व माहिती सीडीआरमधून समोर येऊ शकते. यामुळे सीडीआर काढणे खूप महत्त्वाचे ठरणार आहे.

आतापर्यंत बेडसकरने आपल्या पदाचा गैरवापर करून महिलांना दबावाखाली ठेवले, काहींना ब्लॅकमेल केले तर काहींना खोट्या आश्वासनांच्या जाळ्यात अडकवले. यामुळे अनेक निर्दोष महिलांचे व त्यांच्या कुटुंबांचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. शिक्षण क्षेत्राला गालबोट लावणाऱ्या अशा भक्षक अधिकाऱ्याला फाशी शिक्षा व्हावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. लक्ष्मण बेडसकर हे विनयभंग व पोक्सो अंतर्गत गुन्ह्यातील आरोपी असून तो मोकाट फिरत आहे, यामुळे पोलीस प्रशासनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील जनतेत संताप आहे की, आरोपीला संरक्षण दिले जात आहे का? शिक्षण विभागात असे नराधम मोकाट राहिले तर मुलींच्या सुरक्षिततेची हमी कोण देणार? यामुळे बेडसकरला तात्काळ बेड्या ठोकून कठोरात कठोर शिक्षा व्हावी, आरोपीला लवकरात लवकर अटक करून कारवाई केली नाही तर जनतेचा संताप रस्त्यावर फुटणार यात शंका नाही.

### आरोपी बेडसकरला पकडण्यासाठी दोन पथक तयार करून काय फायदा, पोलीसांच्या ताब्यात होता त्याचवेळी अटक का केली नाही?

शिक्षण विभागाला गालबोट लावणारा बेडसकर याच्यावर विनयभंग व पोक्सो गुन्हा दाखल असूनही पोलीस प्रशासनाची गंभीर बेफिकिरी समोर आली आहे. आरोपी बेडसकरला पकडण्यासाठी आता दोन पथक तयार करून काय फायदा आरोपी केज पोलीसांच्या ताब्यात असूनही फरार झाला, ही बाब जनतेसाठी धक्कादायक व दुर्दैवी ठरली आहे. पोलीसांच्या ताब्यात असूनही आरोपी कसा पळून गेला? हा प्रश्न अधिकच खोल घर करू लागला आहे. अशी गंभीर घटना, जिथे आरोपी पोलीस ताब्यात असूनही फरार होतो, हे पूर्णतः दुर्दैवी आहे. पोलीस प्रशासन सावध असते तर आरोपी इतक्या सहजतेने पळून जाऊ शकला नसता.

### शिक्षण विभागातील आरोपी बेडसकरवर कठोर कारवाई न केल्यास सुरक्षिततेला धोका : इंजि. सादिक इमानदार

बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागातील आरोपींवरील कारवायांबाबत सामाजिक भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजिनिअर सादिक इमानदार यांनी गंभीर मत व्यक्त केले आहे. इंजिनिअर सादिक इमानदार म्हणतात –
शिक्षण विभागातील आरोपींच्या कारवायांवर योग्य ती तपासणी न झाल्यास, मुलींची व महिलांची सुरक्षितता धोक्यात येते. तपासणी अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून आरोपीला तुरुंगात पाठवले पाहिजे, नाहीतर समाजावर जनतेचा विश्वास ढासळेल. आरोपींच्या गैरवर्तनावर सखोल तपासणी न झाल्यास, मुलींच्या आणि महिलांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होतो. तपासणी अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून आरोपीला तुरुंगात टाकणे अत्यावश्यक आहे. जनतेच्या विश्वासाची हानी होऊ नये म्हणून प्रशासनाला सर्वतोपरी उपाय करणे गरजेचे आहे.

# भोजगावाला महापुराचा वेढा; शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान, प्रशासनाकडून तात्काळ मदतीची गरज!

**शासनाचा मदतीचा हात शेतकऱ्यांपर्यंत पोहचणार की, फक्त कागदावरच पंचनामे होणार?**

**शासन तात्काळ मदतीसाठी पुढे आलं नाही तर शेतकरी रस्त्यावर उतरून आवाज उठवणार?**





**नवनाथ आडे । गेवराई**

गेवराई तालुक्यातील भोजगाव परिसर मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे अक्षरशः पाण्याखाली गेला आहे. भोजगावलगत वाहणाऱ्या अमृता नदीला अचानक महापूर आल्याने संपूर्ण गावाला पाण्याचा वेढा बसला. अनेकांच्या घरात पाणी शिरून धान्य, कपडे, फर्निचर, जनावरांचा चारा वाहून गेला. फक्त एवढंच नव्हे तर कोमलवाडी, तळणेवाडी, धोंडराई, उमापूर या भागांतही ढगफुटी सदृश पाऊस झाला. शेतशिवार अक्षरशः जलमय झाले असून शेतकऱ्यांवर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला आहे. उसाची काठी झाली, कापसाचा गुलाब जामून झाला, तुरीची डाळ शिजली, सोयाबीन पूर्ण पाण्याखाली गेली. शेतकऱ्यांच्या हकनाक श्रमाला वाया घालवणारा हा पूर त्यांच्यासाठी आर्थिक संकट घेऊन आला आहे. शेतकऱ्यांच्या घामाने उभं राहिलेलं पीक डोळ्यादेखत वाहून गेलं. ज्यांनी रात्रीचा दिवस करून पिकं उभी केली, त्यांच्यासाठी हा पूर म्हणजे सरळ मृत्यूचा हुकुमच ठरला आहे. गावकऱ्यांनी सांगितले की, आमचे घरदार, जनावरे, अन्नधान्य सर्व काही पाण्याखाली गेले आहे. शासनाने तातडीने मदतीसाठी पुढे यावे, पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी. अन्यथा शेतकरी जगण्यासाठी धडपडतील.

**गावकऱ्यांचा आक्रोश : महापूरानं सर्वकाही वाहून नेलं, आता जगावं तरी कसं?**

भोजगाव, कोमलवाडी, तळणेवाडी, धोंडराई, उमापूर या गावांत महापुराने अक्षरशः थैमान घातले आहे. मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसाने गावोगावी पाणी शिरले असून जनतेची दैना झाली आहे. पूरग्रस्त गावकऱ्यांचे हंबरडे आकाशाला भिडले आहेत. ते संतापून म्हणतात, आमचे घरदार, अन्नधान्य, जनावरे, आयुष्यभराची कमाई पाण्यात वाहून गेली. शासन कुठं आहे? मदत कुठं आहे? पंचनामे कुठं आहेत? गावातील अनेक घरे उद्ध्वस्त झाली आहेत. गोधन चारा नसल्याने उपाशी आहे, शेतातील उभं पीक वाहून गेलं आहे. सामान्य माणसासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न टोकाला आला आहे

## बार्टीच्या सी. ई. टी. परीक्षेचे ढिसाळ नियोजन, विद्यार्थ्यांचे हाल!

बीड- विद्यार्थ्यांनी निवडलेले परीक्षा केंद्र न देता ३०० की. मी. अंतरावर असलेले परीक्षा केंद्र विद्यार्थांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील बार्टी, महाज्योती, सारथी, टी. आर. टि. आय. आणि आर्टी संस्थांकडून स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थांमधून परीक्षा देण्यासंदर्भातील योजनेच्या लाभासाठी प्रशिक्षणार्थ्याची निवड करण्यासाठी बार्टी पुणे मार्फत सामाईक प्रवेश परिक्षा घेण्यात येत आहेत. मात्र हि परीक्षा घेत असतांना बार्टीकडून ढिसाळ नियोजन झाल्याचा आरोप



विद्यार्थ्यांनी केला आहे. निवडलेले परीक्षा केंद्र न देता ३०० कि.मी. दुर असलेली परीक्षा केंद्र विद्यार्थांना दिलेले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक,शैक्षणिक, आर्थिक नुकसान होत असून, विद्यार्थ्यांचे प्रचंड प्रमाणात हाल होतांना दिसत आहेत. बीड शहरात दुरून वेगवेगळ्या जिल्ह्यातून विद्यार्थी बार्टीची सामाईक परीक्षा देण्यासाठी दाखल झालेले असून त्यांचा जाण्या- येण्याचा खर्च, त्यांची राहण्याची कुठे व्यवस्था नाही. त्यामुळे विद्यार्थांचे मोठ्या प्रमाणात हाल होतांना दिसत आहे. बार्टीच्या सामाईक परीक्षेच्या दिसाळ नियोजनामुळे विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. त्यामुळे बार्टी च्या सामाईक परीक्षेचे नियोजन व्यवस्थित रित्या केलं तर अशा विद्यार्थ्यांचे हाल होणार नाहीत, याची दखल बार्टी संस्थेने घ्यावी असे अनेक विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. बहुतांश विद्यार्थी गरीब कुटुंबातील असून आर्थिक समस्येमुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत, त्यामुळे अनेक विद्यार्थी बार्टीच्या ढिसाळ नियोजनावर रोष व्यक्त करत आहेत. विजय भिसे.( विद्यार्थी) आधार सेना कार्यकर्ते राम वाघमारे

## मातंग समाजाच्या विविध मागण्यांचे पंकजाताई मुंडे यांना लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने निवेदन



तलवाडा (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जातींमध्ये लोकसंख्येने दुसऱ्या क्रमांकावर असणारा मातंग समाज आज शैक्षणिक सामाजिक आर्थिक राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या खूप पाठीमागे राहिला आहे या मातंग समाजाला शैक्षणिक सामाजिक आर्थिक राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी अनुसूचित जातीतील आरक्षणाचे अ ब क ड आरक्षण वर्गीकरण केले पाहिजे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी या देशातील दबलेल्या पिचलेल्या कष्टकरी शेतकरी श्रमिकांचे दुःख आपल्या साहित्यातून जगाच्या वेशीवर टांगले आणि अशी विपुल साहित्य संपादना निर्माण केली त्या लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले पाहिजे व मातंग समाज व मातंग समाजातील तत्सम जातींच्या युवकांना उद्योग व्यवसायासाठी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती केली पण निधी अभावी मातंग समाजातील व मातंग समाजातील तस्समजातींच्या युवकांना उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य मिळत नसल्याने मातंग समाजातील तरुण हा सुशिक्षित बेरोजगारीकडे वळला आहे तरी मा. पंकजाताई मुंडे. पशुसंवर्धन व पर्यावरण आणि हवामान बदल कॅबिनेट मंत्री यांना निवेदनाद्वारे लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने विनंती करण्यात येते की आपण वरील मातंग समाजाच्या हिताचे प्रश्न मार्गी लावून मातंग समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करताल आणि मातंग समाजाला न्याय द्याल ही अपेक्षा लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली.

## बीड जिल्हा परिषदेवर प्रशासक आल्यापासून आदर्श शिक्षक पुरस्काराला टाळाटाळ!

गेवराई ( प्रतिनिधी) मागील तीन वर्षापासून जिल्हा परिषदेचे पुरस्कार रखडणे ही एक गंभीर बाब असून, बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षकांचे आदर्श पुरस्कार तीन वर्षांनी जाहीर करण्यात आले होते मात्र मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबरला कार्यक्रम जाहीर झाला तरीही त्या कार्यक्रमाला आवर्जून हजेरी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार हे उपस्थित असतानाही पुरस्कार जाणीवपूर्वक टाळला केला असल्याचेही काही शिक्षकांचे म्हणणे आहे आदर्श शिक्षक पुरस्कार तीन वर्षापासून न दिल्याबद्दल चौकशीची मागणी केली आहे, तर बीड जिल्ह्यात शिक्षकांचे आदर्श पुरस्कार रखडल्याचे समोर आले आहे. जिल्हा परिषदेच्या पुरस्कारांचे वितरण अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत याकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष्य नसल्याचे स्पष्ट होत आहे.केवळ बीड जिल्ह्यात ही समस्या निर्माण झाल्याने संताप व्यक्त केला जात असुन जिल्हा परिषदांमध्ये पुरस्कारांचे वितरण अनेक वर्षांपासून रखडल्याच्या घटना घडत आहेत शिक्षकांचा आदर्श पुरस्कार रखडल्याने त्यांच्या कामाची दखल घेतली जात नाही, याबद्दल अनेक तक्रारी आहेत केवळ शिक्षकांच्या पुरस्कारांचीच नव्हे, तर ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांच्या पुरस्कारांचेही वितरण प्रलंबित आहे.जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता वेळेवर न झाल्यामुळे हे पुरस्कार प्रलंबित राहत आहे का? पुरस्कारासाठी आवश्यक असलेल्या योग्य चौकशी, पाहणी इत्यादी प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळेही पुरस्कार वितरणात विलंब होतो.का ?काहीवेळा पुरस्कारांमध्ये राजकीय हस्तक्षेपामुळेही विलंब होतो का? असा सवाल देखील उपस्थित होत आहे. शिक्षक दिनाच्या निमित्याने कर्तव्यदक्ष शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो गेल्या अनेक वर्षाच्या या परंपरेला प्रशासकीय राजवटीत ब्रेक लागला आहे तीन वर्षापासून जिल्हा परिषदेवर प्रशासनाद्वारे कारभार सुरू आहे प्रशासनामार्फत फक्त पुरस्कार जाहीर केले जात आहेत मात्र पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम घेतला जात नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या तीन वर्षापासून जिल्हा प्रशासनावर प्रशासक असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आदर्श शिक्षक पुरस्कार पाच सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येत असतो मात्र प्रशासक असल्यामुळे बीड जिल्हा परिषदेला या आदर्श सोहळ्याचा विसर पडल्याचे चित्र सध्या तरी निर्माण झाले आहे. सर्व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आदर्श शिक्षकांना शिक्षक पुरस्कार जाहीर केला जात असतो या पुरस्कारामुळे शिक्षकांना एक प्रेरणा मिळते आदर्श शिक्षकांसाठी प्रेरणा देणारे सर्वपल्ली राधाकृष्ण यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे या शिक्षक दिनानिमित्त बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार म्हणून सन्मानित केला जातो. जिल्हा परिषदेच्या पुरस्काराचे महत्त्व वाढले जाते परंतु गेल्या तीन वर्षापासून या पुरस्काराचे महत्त्व कमी झाल्यामुळे शिक्षक बांधवात मोठी नाराजी व्यक्त केली जात असल्याचे पाहायला मिळत आहे बीड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आदर्श शिक्षकांच्या पुरस्कार वितरणाची परंपरा गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे मात्र या पुरस्कार वितरणाला गेल्या तीन वर्षापासून ब्रेक लागला आहे बीड जिल्ह्याला एक शिस्तप्रिय पालकमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याकडेही पाहिले जात असुन तरीही बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या प्रशासनामध्ये तिळभर फरक न पडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे तसेच २०२३ ते २०२५या मागील तीन वर्षात बीडच्या शिक्षण विभागाला शिक्षकांचे कौतुक करायला वेळ मिळेना.

पान ४ वरून..

**बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉ.**

वेळीच त्यांना खाली उतरवून रुग्णालयात दाखल केल्याने प्राण वाचले, कांबळे यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. बीड रेल्वे स्थानकाला डॉक्टर आंबेडकरांचे नाव देण्यात यावे यासाठी आता सर्व आवडकरी जनता मागणी करणार असून येत्या काळात हा लढा आणखी तीव्र होणार आहे असे दिसत असून, केंद्र, राज्यसरकारने व प्रशासनाने यांची तत्काळ दखल देऊन बीड रेल्वे स्थानकाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे अशी मागणी होत आहे.

रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू: रवी वाघमारे, अजय सरवदे ,नितीन सोनवणे दता सौदरमल

आम्ही आंबेडकरी चळवळीतील निडर कार्यकर्ते आहोत. त्यामुळे बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे याबावत कोणतेही दमत नाही. परंतु, कार्यकर्त्यांनी समज दाखवत प्रशासकीय मार्गाने हा लढा उभा करावा, ही आमची ठाम भूमिका आहे. काल प्रेम कांबळे यांनी आत्महत्येचा जो प्रयत्न केला तो अत्यंत चुकीचा निर्णय होता. प्रशासनाने या घटनेकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. बीड रेल्वे स्थानक नामांतरासाठी शिवसेना उबाटा गटाचे वंचित बहुजन आघाडी व ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष सातत्याने लढा देत राहीन तसेच आंबेडकरी चळवळीतील प्रत्येक कार्यकर्त्याच्या मागे ठामपणे उभी राहील.

------------------ह्व

**पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त**

मंत्री मा. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेसाठी बीड शहरासह परिसरातील युवक-युवतींनी मोठ्या उत्साहाने हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला. लहान मुलांपासून तरुणाईपर्यंत प्रत्येक गटातील धावपटूंनी सहभाग घेतल्याने शहरात उत्साही वातावरण निर्माण झाले होते. नागरिक,कार्यकर्ते आणि विविध संघटनांच्या उपस्थितीने मॅरेथॉन परिसरात उत्साहाचे वातावरण होते.पुढे बोलताना ना.पंकजाताई मुंडे म्हणाल्या की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने देशाला एक वेगळे स्थान मिळाले आहे.मोदीजींनी सेवेला सर्वात मोठे अधिष्ठान दिले असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा साजरा केला जात आहे. समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मोदीजींकडून मिळते. आज बीडच्या तरुणाईने मॅरेथॉनमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. आरोग्यदायी, सक्षम आणि सेवाभावी तरुणाई हीच खरी देशाची ताकद आहे. तरुणाईच्या बळावर भारताला जगातील पहिल्या क्रमांकावर आणण्याचे स्वप्न नरेंद्र मोदी पाहत आहेत आणि त्याची पूर्तता आपण सर्वांनी मिळून करायची आहे. मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेल्या विजेत्या धावपटूंना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करून गौरविण्यात आले. यावेळी याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, योगेश क्षीरसागर, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, आदित्य सारडा, पालसिंगणकर काका, अशोक लोढा, सलीम जहांगीर,चंद्रकांत फड, कल्याण कुलकर्णी, इर्शाद भाई, अजय सवई,अनिल चांदणे, मिराताई गांधले, सुवर्णाताई लांबरूड, शिवाजी मुंडे, श्रीकांत सानप, सुंदर चव्हाण, मनोज पाटील,अशोक रसाळ, मच्छिंद्र झाटे, कृष्णा तिडके, संध्यताई राजपूत, संगीता धसे, सुनिल मिसाळ,धनंजय वाघमारे, शिवाजी मुंडे, संग्राम बांगर, अमोल वडतिले, केशव बडे, सुखदेव रेडे, अमरसिंह मस्के, ईश्वर तांबडे, बालासाहेब बादाडे, जोत्स्नाताई बादाडे,महादेव नागरगोजे, गणेश बडे, जय दहिफळे, सुरेश पवार, बांगर प्रदीप, जिजा मिसाळ, दत्तप्रसाद जाधव यासह भाजपाचे पदाधिकारी, युवा मोर्चाचे कार्यकर्ते, महिला व तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होती.

जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांचे परिपूर्ण चोख नियोजन.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष पदाची धुरा संजय आंधळे यांच्या खांद्यावर घेतल्यापासून अवघ्या एका महिन्यात बीड जिल्ह्यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचा धडाका लावला असून युवा वर्गामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.काल बीडमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नमो युवारन, नशामुक्त भारत, मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. या भव्य मॅरेथॉनचे आयोजन भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे व युवा मोर्चा टिमने चोख नियोजन केले. नमो युवारनला प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्याने मागच्या काही काळापासून पहिल्यांदाच युवा मोर्चाचा ऐवढा मोठा यशस्वी कार्यक्रम झाला अशी नागरिकांत चर्चा होती.

--------------------

**शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत**

होते. बांधावर मोठ्या संख्येने शेतकरी हजर राहून आपल्या यातना आणि आक्रोश व्यक्त करत होते. प्रकाश उजगरे म्हणाले : शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्या; अन्यथा वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल. शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आहेत, पिके वाहून गेली आहेत, आणि जगण्याचा प्रश्न उभा आहे. या संघर्षाच्या काळात वंचित बहुजन आघाडी शेतकऱ्यांसोबत खंबीरपणे उभी राहील, असे ठाम आश्वासन उजगरे यांनी दिले.

------------------

**तेली समाज दांडिया महोत्सवाचे माजी मंत्री**

आयोजन करण्यात येत आहे. यंदाच्या दांडिया महोत्सवाचे चौथे वर्षे आहे. मंगळवारी सायंकाळी सहा वाजता राज्याचे माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे साहेब, यांच्या हस्ते देवीची व श्री शनि देवाची आरती करून दांडिया महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यंदा या महोत्सवात दांडिया बरोबरच महिलांसाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून आकर्षक बक्षीस देण्यात येणार आहेत. रांगोळी स्पर्धा, यामध्ये बक्षीसी सम्राट वॉच, नेक ब्रँड, संगीत खुर्ची, बक्षीसे सोन्याची नत, ईगल स्पर्धा, मोठा गट बक्षीसे फेशियल किट, होम मिनिस्टर, बक्षीस ४३ इथं एलईडी टीव्ही, कुलर पैठणी देण्यात येणार आहेत त्याचबरोबर मंगळवारी महिलांसाठी मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवारी (ता.०१) राजश्री धनंजय मुंडे. यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ संपन्न होणार आहे. या सर्व कार्यक्रमास महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आव्हान संयोजक युवा नेते पवन फुटके. चंद्रशेखर फुटके. राहुल शिरसागर. सोमनाथ वाघमारे. राजकुमार भाग्यवंत अशोक रोकडे. सतीश फुटके. रवी अन्नपूर्णे. जयवंत कोले.सचिन लासे.शंकर कोल्हे. शंकर नाईक. प्रदीप इंगळे. सुहास जठार. प्रेम जठार.आदींनी केली आहे.

--------------------

**बप्पा, आपण मुस्लिम समाजा सोबत**

लिहिणे बंधनकारक आहे. पण आपण जाणून बुजून याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे,असे जनतेकडून सांगण्यात येत आहे. तसेच मुस्लिम भागात रस्ते नाहीत,नाल्या नाहीत , खांबावर पथदिवे नाहीत, घंटागाडी येत नाही.आपण मुस्लिम लोकांना आश्वासन दिले होते, मी खासदार फंडातून मुस्लिम भागाचा विकास करेल, साहेब कुठे गेला विकास? आपण मुस्लिम समाजाकडे पाठ फिरवण्याचे काम करू नका, हीच मुस्लिम समाजाची इच्छा आहे.

----------------

**कास पठाराच्या रंगीबेरंगी माळावर बीडचा डंका**

ही हाफ मॅरेथॉन विशेषतः कठीण मानली जाते. १०.५ किलोमीटरचा कास पठाराचा घाट चढत वर जाऊन परतीचा १०.५ किलोमीटरचा उतार अशी ही धावपट्टी असते. यंदा देशभरातून तसेच विदेशातून तब्बल ८५०० धावपटूंनी या मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला होता. त्यात बीडच्या ५० धावपटूंची कामगिरी विशेष ठरली. यात योगा ग्रुपच्या ३२ रनर्सचा उल्लेखनीय सहभाग होता.

बीडच्या योगा ग्रुपचे शरद खिल्लारे यांनी सातारा मॅरेथॉन केवळ १ तास ४४ मिनिटांत पूर्ण करून सर्वसाधारण गटात ९ वा क्रमांक पटकावला. योगा ग्रुपसह इतर बीडच्या खेळाडूंनी एकूण ६ सुवर्ण, १६ रौप्य व २८ कांस्य पदके पटकावून बीडचा झेंडा उंचावला सुवर्णपदक विजेत्यांत राहुल पवार, संतोष भोकरे, जालिंदर बेदरे, प्रभाकर जाधव, विभुते व शरद खिल्लारे यांचा समावेश आहे. तर अमर नाईकवाडे, गजानन खांडे, गणेश वाघमारे, विनोद गर्जे, डॉ. लक्ष्मण वारे, विक्रांत डोके, श्रीकांत खांडेकर, विजय वाघमारे, डॉ. रोहन गायकवाड, जयेश भूतपल्ले, डॉ. संदीप येवले, राम सालगुडे, प्रशांत माने, कल्याण कुलकर्णी, प्रदीप उजागरे, शरद शेरेकर, डॉ. सचिन ढगे व प्रकाश दामा यांनी रौप्यपदक मिळवले. बाळासाहेब कांबळे, शंकर शिंदे, लक्ष्मण बारगजे, दीपक ससाने, डॉ. संतोष महानोर, गणेश वाघ, संदीप मानोरे, सुदर्शन शिंदे, महेश तांदळे, विशाल सुसकर, प्रशांत पोळ, शहाजी जगताप, नानासाहेब जाधव, डॉ. सुहास देशपांडे, डॉ. किरण कोळेकर, ज्ञानेश्वर भोईटे, संजय पोळ व डॉ. घुले आदींनी कांस्यपदक पटकावले. सातारा हाफ हिल मॅरेथॉनमधील या चमकदार यशामुळे बीड जिल्ह्यातील धावपटूंचा आत्मविश्वास वाढला असून, जिल्ह्यातील योगा ग्रुपचे धावपटू पुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी सज्ज होत आहेत.

धावपटूंनी घेतला अविस्मरणीय अनुभव

पावसाळ्यात फुलांनी नटलेले साताऱ्याचे कास पठार म्हणजे निसर्गाची रंगपंचमीच. या रमणीय घाटावरून जाणारी २१ किमी हाफ हिल मॅरेथॉन धावपटूंसाठी खरी कसोटी ठरते. निसर्गसौंदर्याचा आनंद घेत घेत डोंगर चढ-उतार करत पूर्ण केलेली ही शर्यत खेळाडूंना अनुभव ठरली, असा सूर बीडच्या धावपटूंनी व्यक्त केला.

------------------

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गायरान**

करण्यासाठी केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या सोबत जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड,तालुका सरचिटणीस गौतम बचुटे , ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे,आय टी सेल तालुका प्रमुख सुरज काळे, तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे,येवता सर्कल प्रमुख हरिश गायकवाड,विनोद गायकवाड, रोहित कांबळे,प्रदिप शिनगारे,किशोर गरूड, नवनाथ खाडे, दिलीप खाडे,सरवदे,महिला आघाडी येवता सर्कल प्रमुख सरस्वती शिनगारे, भगवान कांबळे,रवी गायसमुद्रे,अन्वर शेख,वैभव जाधव,आदर्श जाधव हे केज तालुक्यातील गाव अन् गाव पिंजून काढून गायरानधारक आणि ऊसतोड मजूर यांनी मोठ्या संख्येने महाधरणे आंदोलनात सहभागी होण्यासाठी कानडीमाळी येथे येवता सर्कल नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी संवाद साधताना नागरिकांनी विविध समस्या आणि अडीअडचणी सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी मदत करण्याची देखील अपेक्षा व्यक्त केली.

------------------

**गेवराई बाजार समितीच्या सभापतीपदी**

मानाची संस्था आहे. एक रुपयाचेही कर्ज आपल्या बाजार समितीवर नाही. शेतीसाठी खुप कामे करायचे आहे. बाजार समितीत कोल्ड स्टोरेज सुरु करायचे आहे. बाजार समितीत शेतीची वारंवार चर्चा होण्यासाठी एक नवे दालन सुरु करणार आहोत. राजकीय चर्चेशिवाय शेती मातीची आणि शेतकरी हिताची चर्चा व्हावी हीच आली भुमिका आहे. आपण जर प्रामाणिकणे काम केले तर विधानसभा निवडणुकीत मतदारांनी टाकलेल्या विश्वास आपण सार्थ करु. पाऊस आणि पुरग्रस्त परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. आता भेदभाव करायचा नाही. अडचणीतल्या प्रत्येक व्यक्तीला आपल्याला मदत करायची आहे. सर्व शेतकऱ्यांची झालेली नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत असे सांगून कुणीही धिर सोडू नये असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा प्रयत्न शिवछत्र परिवार करत आहे ---आ. विजयसिंह पंडित याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, सर्व संस्थांमध्ये शिवछत्र परिवाराने सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा कायम प्रयत्न केला आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व आपल्याकडे आहे, आपली जबाबदारी वाढली आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी शेतमजूर यांना दिलासा आणि आधार देण्याचे काम करायचे आहे. जाती जाती जातीमध्ये तेढ निर्माण करुन शिवछत्र परिवाराला बदनाम करण्याचे काम कांहीं लोक करत आहेत, त्यांचा कुटील डाव हानून पाडावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले मी सभापती झालो, यावर विश्वास बसत नाही --- जगन्नाथ काळे

याप्रसंगी बोलताना नवनिर्वाचित सभापती जगन्नाथ काळे म्हणाले की, आज मी सभापती झालो यावर विश्वास बसत नाही. आमचे नेते अमरसिंह पंडित यांनी टाकलेला विश्वास आपण सार्थ करु असेही ते म्हणाले.

उपकार कधीही विसरणार नाही ---उपसभापती श्रीहरी पवार

माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आपण प्रामाणिक आणि निष्ठेने काम करु. माझ्यासारख्या सामान्य माणसालाला शिवछत्र परिवाराने सर्वात मोठ्या पदावर बसवले. शिवछत्र परिवाराचे उपकार आण कधीच विसरणार नाही असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी माजी सभापती मुजिब पठाण यांनीही मनोगत व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी बाजार समितीचे संचालक अशोक नाईकवाडे, पांडुरंग मुळे, रामलाल धस, हनुमान कोकणे, महारुद्र चाळक, बाबासाहेब जाधव, रमेश साखरे, अशोक खरात, रमेश खोपडे, मंगेश कांबळे, दिलीपकुमार जैन, राम चाळक, कृष्णा राऊत, सौ.वैशाली जाधव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------------

**रविवारी बीड येथे होणाऱ्या ओबीसी**

समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सत्संग मुंडे यांनी केले आहे. माजलगाव येथे दि. २१ सप्टेंबर २०२५ रोजी महाएल्गार मेळाव्याच्या पूर्व तयारी संदर्भात समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील ओबीसी समाज बांधवांची बैठक संपन्न झाली. यावेळी सत्संग मुंडे बोलत होते. या बैठकीस भाजपा भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे, नाभिक समाजाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे, परीट समाजाचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ शिंदे, ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने, माजलगाव पंचायत समितीचे माजी सभापती दिनेश गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवप्रसाद खेत्रे, संजीवनीताई राऊत, रूपमानंद खेत्रे बळीराम यादव संतोष रासवे जगन्नाथ खेत्री, ओबीसी महासंगाचे तालुका अध्यक्ष शामसुंदर आमर गिरी पाचाळ ज्ञानेश्वर कोरडे, बाबासाहेब आडाव, शिवाजी आढाव किशोर पाचाळ महादेव नाना आढाव शंकर गावडे कुंडलीक आढाव रामेश्वर आढाव आनंत आढाव सचिन रासवे मच्छिंद्र आढाव भरत आढाव बाबु आढाव भाऊ कबळे अशोक आढाव सतिश यमगर नारायण आढाव मयूर पाचाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सत्संग मुंडे पुढे म्हणाले की, रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी बीड येथे

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, राज्याचे कॅबिनेट मंत्री ना.छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचा भव्य महाएल्गार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटिअरच्या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याचा जीआर महाराष्ट्र शासनाने काढला असून यामुळे ओबीसी समाजामध्ये कमालीची भीती आणि सरकार विरोधात प्रचंड असंतोष पसरला आहे. मराठा समाज बांधवांना आरक्षण देण्याला ओबीसी समाजाचा विरोध नाही मात्र ओबीसी समाजाच्या आरक्षणावर अन्याय करणारा निर्णय महाराष्ट्र शासन घेत असल्याने या निर्णयाच्या विरोधात राज्यातील ओबीसी समाज बांधवांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येते की काय? या भीतीमुळे ओबीसी समाजातील नागरिक आत्महत्या सारखे पाऊल उचलू लागले आहेत. यामुळे ओबीसी समाजाला धीर देण्यासाठी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण स्वतंत्र आणि अखंड ठेवण्यासाठी या महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यास बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधव आणि भगिनींनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीस माजलगाव तालुक्यातील समता परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ओबीसी समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १४० कोटींचे सिमेंट रस्ते पण धोकादायक रोहित्रे-खांब मधोमध अपघाताला निमंत्रण

बीड (प्रतिनिधी):- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त बीड येथे आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत रेल्वे स्टेशन शुभारंभाचा कार्यक्रम पार पडला. या मार्गावरील धोकादायक रोहित्र प्रशासनाने फक्त मंडपाच्या कपड्याने झाकून ठेवले होते. त्यामुळे प्रशासनाची नामुष्की झाली आणि रोहित्रांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.

या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अजित पवार यांचे लक्ष वेधण्यासाठी आज (दि.२२ सप्टेंबर) सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सेल्फी विथ रोहित्र - हॅशटॅग अजितदादा हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात रामनाथ खोड, अशोक येडे जिल्हाध्यक्ष (आप) ,रामधन जमाले जिल्हाध्यक्ष (इंटक), बाळासाहेब मोरे पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच , स्थानिक नागरिक, कार्यकर्ते व सखाराम बेंगडे सचिव (इंटक), शेख मुस्ताक,शेख मुबीन, नागरिक युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. १४० कोटींचे रस्ते, पण रोहित्रे जागेवरच! नगरोत्थान सुवर्ण जयंती योजनेतून टप्पा क्रमांक १ मध्ये ७० कोटी आणि टप्पा क्रमांक २ मध्ये ६९ कोटी असे एकूण १४० कोटी रुपयांचे ६० फुट रुंदीचे सिमेंट रस्ते व नाल्यांची कामे करण्यात आली.




मात्र या कामांदरम्यान महावितरणचे विजेचे खांब व रोहित्र स्थलांतरित करण्यासाठी निधीची तरतूद न झाल्याने ते रस्त्यांच्या मध्यभागीच राहिले. परिणामी वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढत आहे. नगरपालिका व महावितरण एकमेकांवर जबाबदारी ढकलत असताना नागरिक मात्र जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. विशेषतः नगरनाका ते कृषी कॉलनी मार्गावर, तुळजाई चौक व एसबीआय बँकेजवळील रोहित्र गंभीर धोक्याचे कारण बनले आहेत. उघडी उपकरणे अपघातास आमंत्रण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड, राजीव गांधी चौक, बार्शी नाका, केएसके महाविद्यालय, सुभाष रोड, जुने एसपी कार्यालय, कंकालेश्वर मंदिर व साठे चौक या भागांत जमिनीलगत असलेली उघडी उपकरणे, मोडकळीस आलेली रोहित्रे व फ्युज बॉक्स नागरिक व जनावरांच्या जीविताला सतत धोका निर्माण करीत आहेत.

३ कोटी निधीची मागणी

बीड शहरातील १५७ वीज खांब व १७ रोहित्रे सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी किमान ३ कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून तो जिल्हा नियोजन समितीमार्फत उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी या आंदोलनातून करण्यात आली.

## पांगरी रोड, छ.संभाजीनगर येथे नळयोजना असूनही नगरपालिकेकडून पाणीपुरवठा नाही-हरिश्चंद्र ठोसर;शिवसंग्राम तीव्र आंदोलन करणार-हरिश्चंद्र ठोसर

बीड़ (वार्ताहर) - पांगरी रोडवर असलेल्या छत्रपती संभाजीनगर कॉलनीत दिर्घकाळापासून अमृत अटल नळयोजनाची व्यवस्था होऊनही नगरपालिकेकडून मागील तीन वर्षापासून पाणीपुरवठा होत नाही. या परिसरातील नागरिक दररोज पिण्याच्या आणि दैनंदिन वापरासाठी पाण्यासाठी त्रस्त आहेत.



स्थानिकांनी माहिती दिली की, गेल्या तीन वर्षापासून पाणी पुरवठा न झाल्यामुळे ते जलसंकटाचा सामना करत आहेत. विशेषतः उन्हाळ्यात ही समस्या अधिक भडकून येते. नळयोजनेत पाणी उपलब्ध असले तरीही नगरपालिकेकडून नियमित पाणी सोडले जात नाही, त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी खाजगी टँकरवर अवलंबून रहावे लागत आहे. पाणी पुरवठा न झाल्यामुळे आरोग्य आणि स्वच्छतेवरही नकारात्मक परिणाम होत आहे. याबाबत शिवसंग्राम व स्थानिकांनी प्रशासनाकडे त्वरित पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आणि समस्या गंभीरतेने घेण्याची मागणी नगरपालिका प्रशासनाकडे अनेकवेळा केलेली आहे.परंतु अद्याप पर्यंत याची दखल घेतली नाही.भर पावसाळ्यात येथील रहिवाशीयांना पिण्याचे पाणी मिळेना. नगरपालिका प्रशासनाने तात्काळ पाणीपुरवठा याभागासाठी चालू करावा,अन्यथा शिवसंग्रामच्या वतीने स्थानिक रहिवाशीयाना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसंग्राम विभाग प्रमुख हरिश्चंद्र ठोसर यांनी दिला आहे. नगरपालिकेकडून या संदर्भात अद्याप काहीही अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. नागरिकांनी भविष्यात या समस्या दूर करण्यासाठी प्रशासनाला सूचना देण्याची तयारी सुरू केली आहे. दररोजच्या जीवनात पाण्याची गरज असूनही असलेली ही समस्या लवकरात लवकर सोडवावी अशी स्थानिकांची अपेक्षा आहे.

## केज वकील संघाचे नव निर्वाचित अध्यक्ष अड.एम.एस लाड उपाध्यक्ष अड.एस.एल गलांडे तर सचिव अड. एस.एन अंबाड यांची निवड



केज (प्रतिनिधी):- केज वकील संघाची निवडणूक नुकतीच पार पडली असुन अध्यक्ष पदी अड.एम.एस लाड, उपाध्यक्षपदी अड.एस.एल गलांडे तर सचिव पदावर अड.एस.एन अंबाड यांची निवड करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की दि.१८ सप्टेंबर रोजी केज वकील संघाची निवडणूक पार पडली. अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत अड.एम.एस लाड यांना ८२ तर अड.एस.वाय मुंडे यांना ६४ मते मिळाली १८ मताने अड.एम.एस लाड विजयी झाले आहेत. तर उपाध्यक्ष पदासाठी अड.गलांडे एस.एल यांना ९९ मते मिळाली. अड.ए.बी.सोनवणे यांना ५० मते मिळाली आहेत. अड.एस.एल गलांडे ४९ मतांनी विजयी झाले आहेत. तर सचिव पदासाठी अड.एस.एनअंबाड यांना ७८ मते मिळाली तर अड.इतापे पी.डी यांना ६९ मते मिळाली अड.एस.एन अंबाड ९ मताने विजयी झाले आहेत. कोषाध्यक्ष पदावर अड.एस.एस देशपांडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. तसेच सह सचिव पदावर अड.सिरसाट तर ग्रंथपाल म्हणून अड.जे.जी बारगजे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अड.एस.सी जाधव यांनी कामकाज पाहिले तर त्यांना अड.डब्ल्यु.ए शेख व अड.पी.ए हुंबे यांनी सहकार्य केले. केज वकील संघाच्या सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## ना. पंकजाताई मुंडे यांनी शेताच्या बांधावर जावून केली नुकसानीची पाहणी



बीड (प्रतिनिधी):- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पाटोदा तालुक्यात शेताच्या बांधावर जावून नुकसानीची पाहणी केली. शासकीय मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील आहे अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला.

बीड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीत अतोनात नुकसान झालेल्या पाटोदा तालुक्यातील भाकरेवस्ती तसेच वैद्यकिन्ही परिसरातील शेताच्या बांधावर जावून पंकजाताई मुंडे यांनी दुपारी नुकसानीची पाहणी केली. पावसामुळे बाजरी, सोयाबीन, कापूस, उडीद आदी पिके पूर्ण जमीनदोस्त झाली आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनामार्फत मदतीसाठी आपण प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पाहणी करताना त्यांच्यासमवेत महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान अंतर्गत महिलांची आरोग्य तपासणी



दौलावडगाव (प्रतिनिधी): १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री राष्ट्राच्या आरोग्य दृष्टीकोनात बदल घडवण्यासाठी संपूर्ण देशभर महिला आरोग्य तपासणी, उपचार सेवा आणि पोषण यावर विशेष भर देण्यासाठी सर्व महिलांसाठी तपासणी आणि आरोग्य सेवा,रक्तदाब, मधुमेह, नेत्र, दंत रोग तपासणी,स्तन व गर्भाशय मुख व मुख कर्करोग तपासणी,गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी,लसीकरण सेवा, रक्त व हिमोग्लोबिन तपासणी,क्षयरोग तपासणी

सिकसेल आजार व रक्तक्षय तपासणी विशेष तज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन निरोगी जीवनशैली आणि पोषण स्थानिक व क्षेत्रीय आहारालाप्रोत्साहन देणे गरोदर आणि स्तनदा मातांसाठी तसेच लहान बाळांसाठी योग्य आहारमासिक पाळी स्वच्छता व पोषणटेक-होम राशन चे वितरण आरोग्य सेवा घेणे सोपे करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग माता व बालसुरक्षा कार्ड प्रधानमंत्री मातृ वंदना योजना नोंदणी आयुष्मान वय वंदना कार्ड,सिकल सेल कार्ड,पोषण ट्रॅकर मध्ये लाभार्थी नोंदणी,रक्तदान शिबीर,निक्षय मित्र स्वयंसेवक नोंदणी,अवयवदान नोंदणी हे स्वस्थ नारी, सशक्त परिवार, हाच आहे विकसित भारताचा आधार उपक्रम घेण्यात आला. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, कडा बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, कडा शहराचे माजी सरपंच अनिल ढोबळे,उपसरपंच दिपक कर्डीले,डॉ.अशोक गांधी,डॉ.श्रीकांत सांगळे,महेश नाथ, पाटणचे सरपंच दादासाहेब जगताप,राजेंद्र शिंदे,डॉ.प्रियंका सिघन,विद्या पवार,डॉ.नितीन घोडके,पत्रकार रघुनाथ कर्डिले,प्रा.संजय खंडागळे,नितीन कांबळे याच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त एक शाम मोदीजी के नाम कार्यक्रमात बीड जिल्ह्याचा सन्मान

केज (प्रतिनिधी):- भारतीय नमो संघाच्या वतीने दिल्ली येथील एन डी एम सी कन्वेक्शन सेंटर,संसद मार्ग नवी दिल्ली येथे एक शाम मोदीजी के नाम कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील दोघांचा सन्मान करण्यात आला या बाबत सविस्तर माहिती अशी की,दि. १७ सप्टेंबर रोजी भारताचे यशस्वी पंतप्रधान आदरनीय नरेंद्रभाई मोदीजी यांचा वाढदिवस देश विदेशा तील विविध ठिकाणी वेगवेगळया स्वरुपात साजरा केला जातो. यामध्ये सामाजिक उपक्रम,रली,अन्नदान, धार्मिक कार्यक्रम, देशभक्तीपर कार्यक्रम अशा प्रकारची जन हिताची कामे केली जातात.याचाच एक भाग म्हणून एन डी एम सी कनव्हेक्शन सेंटर, संसद मार्ग,नवी



दिल्ली येथे एक शाम मोदीजी के नाम हा देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला विशेष आमंत्रण भारतीय नमो संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. भाऊसाहेब घोडके, हेमंत कालीया राष्ट्रीय मंत्री मुंबई,व भारतीय नमो संघाचे केज तालुकाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष पत्रकार श्री.चंद्रकांत पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना आमंत्रित करण्यात आले होते.या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती नमो संघाचे राष्ट्रीय रक्षक श्री.नरेशजी बन्सल संसद सदस्य राज्यसभा राष्ट्रीय कोषाध्यक्ष भारतीय जनता पार्टी, भाजपा पुर्व सांसद अनिताजी आर्या, वरीष्ठ,नमो संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मन्नुजी तोमर,नमो संघ राष्ट्रीय संघटन मंत्री हेमंत शर्मा, राजनितीज्ञ तथा आर एस एस नेता यांच्यासह विवीध मान्यवर उपस्थित होते.भारतीय नमो संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मन्नुसिंहजी तोमर यांच्या संकल्पनेतून हाकार्यक्रम घेण्यात आला.मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यानंतर देश भक्तीपर गितांचा कार्यक्रम शालेय विद्यार्थ्यांचा संपन्न झाला.यावेळी देशभक्ती मुळे भावनिक वातावरण तयार झाले होते.यानंतर स्वदेशी वस्तुंचीच खरेदी करण्यासाठी सर्वांनी शपथ घेतली.मा.खा. नरेशजी बन्सल यांनी भारतीय नमो संघाच्या कार्याची प्रशंसा करून सदैव नमो संघाच्या पाठिशी असल्याची ग्वाही दिली तसेच पंतप्रधान नरेंद्र भाई मोदीजी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.मान्यवरांच्या भाषणानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रम संपन्न झाला.

## आष्टी ठाणे हद्दीत दरोडे घालणारा कुख्यात दरोडेखोर 'फेऱ्या' जेरबंद!

दौलावडगाव (प्रतिनिधी):- गेल्या अनेक दिवसांपासून ठाणे हद्दीत साथीदारांना सोबत घेऊन शस्त्रत्र दरोडे घालून धुमाकुळ घालणाऱ्या कुख्यात दरोडेखोराला आष्टी पोलिसांनी मोठ्या शिताफिने पकडून बेड्या ठोकल्या असून चोभानिमगाव,आंधळेवाडी येथे दरोडा टाकल्याची कबूली दिली आहे. आष्टी तालुक्यातील शेरी बुद्रुक येथे वास्तव्यास असणारा ३२ वर्षीय फिरोज उर्फ फेऱ्या संदिप चव्हाण या कुख्खात दरोडेखोर गेल्या काही दिवसांपुर्वी आष्टी ठाणे हद्दीतील चोभानिमगाव व आंधळेवाडी या दोन ठिकाणी सशस्त्र दरोडे टाकून सोन्यासह,रोख रक्कम लंपास केली होती.पोलिस दरोडेखोरांचा शोध घेत असताना गोपनीय बातमीदारांकडून 'फेऱ्या' भोसलेचे नाव समजले.पोलिसांनी खात्री केली पण तेव्हापासून तो गावात नसल्याने पोलीस त्याच्या मागावर असताना दुपारच्या



दरम्यान एका दुचाकी शोरूम मध्ये आल्याची माहिती कळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडले.दरोडेखोर सध्या पोलिस कोठडीत आहे.पोलिसांनी एक लाख रूपयांसह दरोड्याचे साहित्य जप्त केले आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे,पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे,पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर, पोलीस अंमलदार मजरूद्दीन सय्यद, अशोक तांबे,बब्रुवाण वाणी,संतोष दराडे,प्रभाकर खोले,भाऊसाहेब आहेर यांनी केली.

## रिपाईच्या महाधरणे आंदोलनात हजारोच्या संख्येने शामिल व्हा- रवींद्र वीर

बीड (प्रतिनिधी) अनेक वर्षांपासून कसत असलेल्या व नविन अतिक्रमणित गायरान जमिनीच्या प्रलंबित प्रकरणे नियमाकुल करुन गायरान



धारकांच्या नावे करण्यासाठी महाधरणे आंदोलनाचे आयोजक युवा रिपाई प्रदेशाध्यक्ष तसेच रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पुजी कागदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्हा रिपाइंच्या वतीने विराट महाधरणे आंदोलन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करून घेण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे. १९९० शासन परिपत्रक (शासन जी.आर) नुसार गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक शेतमजूर व उसतोड कामगार यांना प्रतिमहिना ३००० रुपये पेन्शन (अनुदान) देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उताऱ्यावर असणाऱ्या पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे. आदी प्रमुख मागण्याचे शासन स्तरावर पूर्तता करण्यासाठी मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर रिपाइंच्या वतीने करण्यात येणाऱ्या महाधरणे आंदोलनात गायरान धारकांसह शहरातील रिपाइं पक्षाधिकारी, महिला व कार्यकर्ते यांच्यासह घरकुल धारक यांनी हजारोच्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन युवा तालुका सचिव रवींद्र वीर यांनी केले आहे

## सम्यक विद्यार्थी आघाडीचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे यांचा साळेगाव-केज मध्ये भव्य सत्कार

केज (प्रतिनिधी):- सम्यक विद्यार्थी आघाडीचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे यांचे साळेगाव येथे आगमन झाले असता गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी लक्ष्मण ओव्हाळ जिल्हा सचिव युवक वंचित बहुजन आघाडी बीड पूर्व, तसेच ओबीसी बांधव, मराठा-मुस्लिम बांधव आणि गावातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी बोराडे यांना शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव केला.

सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रश्नांवर सम्यक विद्यार्थी आघाडीने उभारलेल्या चळवळीबाबत




व प्रशांत बोराडे यांच्या कार्याबाबत या वेळी विशेष कौतुक करण्यात आले. संभाजीनगर वरून सोलापूरकडे जाताना साळेगाव येथे झालेल्या या धावत्या भेटीत भारत बुदगुडे, दत्ता तोंडे, बालाजी पटने, सिद्धेश्वर मुळे, राजाभाऊ पारखे, सोहेल पठाण, राजाभाऊ सरवदे, अशोक बचूटे, बालू मुळे, बिभीषण गित्ते, मोहन पारखे, सय्यद चाँद, सुधीर पारखे, सर्जेराव लांडगे, गणेश वर्पे, विक्रम वर्पे, बालाजी मेडकर, ओम मुळे, दीपक मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.



**पिंपळा : नवरात्र हा पवित्र उत्सवाची सुरुवात झाली.दरवर्षी पिंपळा गावातील युवकवर्ग मोठ्या संख्येने श्री.क्षेत्र तुळजापूर या ठिकाणाहून दोन दिवसात पायी ज्योत घेऊन येतात.त्यानंतर गावामध्ये ज्योतीची प्रदक्षिणा मिरवणूक उत्साहात पार पडते.नंतर जगदंबा देवीच्या मंदिरासमोर आरती घेऊन कार्यक्रम संपन्न होतो.यावेळेस सर्व ग्रामस्थांच्या वतीने ज्योत घेऊन येणारे युवकांचे स्वागत केले जाते.**

## कालिकादेवी विद्यालय बुद्धिबळ स्पर्धेत तालुक्यातून अव्वल

शिरूर कासार (प्रतिनिधी):- शिरूर (कासार) 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद गटशिक्षण कार्यालय, शिरूर (का.)ता.शिरूर (का.)जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.ही शालेय बुद्धिबळ स्पर्धा वयोगट १७ व १९ वर्षाखालील मुलांसाठी होती.या स्पर्धेमध्ये कालिकादेवी विद्यालयाचे मा.प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार चि.शोयब शौकत आत्तार या विद्यार्थ्याने १७ वर्ष वयोगटात प्रथम



क्रमांक पटकावला.तर १९ वर्ष वयोगटात अनुक्रमे कु.सानिका शरद शिंदे व कु.राणी राजेंद्र शिंदे यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.या जिंकलेल्या स्पर्धकांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या शालेय बुद्धिबळ स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे व प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलांच्या बुद्धिबळ स्पर्धेची तयारी अतिशय कौशल्याने करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दोन्ही गटात तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तालुक्यामध्ये कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक केले आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील तिन्ही विद्यार्थी स्पर्धकांना जिल्हास्तरीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, मा.रोहीत (दादा) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी मा.डॉ.राजू मचाले,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक मा.एम.ए.राऊत, प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

# बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या कॅबिन बाहेर प्रेम कांबळेचा आत्महत्या करण्याचा प्रयत्न?

### प्रेम कांबळेचा अनेक दिवसांपासून रेल्वे स्थानकाला बाबासाहेबांचे नाव देण्यासाठी लढा प्रशासन खडबडून झाले जागे







बीड (प्रतिनिधी):- बीड रेल्वे स्थानकाला डॉ. चाचासाहेव आंबेडकर यांचे नाव देण्यात वावे करीता गेली अनेक महिन्यापासून आंबेडकरवादी अनुवाया कडून संविधानीक मागनि जिल्हाधिकारी कार्यालय बीड समीर उपोषण, आंदोलन करून मागणी बारंवार केली जात आहे, पालकमंत्री ना अजित (दादा) पवार, खासदार बजरंग सोनवणे यांना देखील निवेदने देऊन मागणी केली मात्र जिल्हा प्रशासन, पालकमंत्री हे याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आंबेडकरवादी अनुयायी बांच्या कडून सांगितले जात आहे. १७ सप्टेंबर रोजी बीड रेल्वे स्थानकाचे उद्घाटन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेच, उपमुख्यमंत्री बीडचे पालकमंत्री अजित (दादा) पवार साहेच, यांच्या हस्ते बीड रेल्वे चे उद्घाटन झाले. यावेळी देखील आंबेडकरवादी अन्यायांनी बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे करीता मागणी केली. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी शासन प्रशासन ठोस पावले उचलत नसल्याचे सांगत बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाच देण्यात याचे या मागणीसाठी भीमसैनिक प्रेम कांबळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे रात्री ९.३० च्या दरम्यान फाशी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र पान २ वर...

*राजकारणा पलीकडील मौल्यवान हिरे दिसतात हीच बीड जिल्ह्याची शक्ती:-ना.पंकजाताई मुंडे.*

## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये युवा मॅरेथॉनचे ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शुभारंभ



बीड (प्रतिनिधी):- भारताचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेची खरी कमाल म्हणजे राजकारणाच्या पलीकडेही असे मौल्यवान हिरे आमच्या बीड जिल्ह्यात दिसतात.हीच आमची खरी शक्ती आहे. युवकांनी स्वत:साठी नाही तर समाज व देशासाठी स्वप्न पाहिले पाहिजेत, युवकांनी सकारात्मक, रचनात्मक आणि देशाभिमुख कामांमध्ये लक्ष घालणं व समाजसेवा तरुणाई हीच खरी देशाची ताकद आहे. असे स्पष्ट प्रतिपादन भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव तथा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज दि.२१ रोजी बीड येथील नमो युवा रन,नशामुक्त भारत मॅरेथॉनच्या शुभारंभा प्रसंगी मत व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या वतीने सेवा पंधरवाडा अंतर्गत रविवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नमो युवारन, नशामुक्त भारत मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉनचा भव्य शुभारंभ राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण पान २ वर...

*वंचित बहुजन आघाडी शेतकऱ्यांच्या बांधावर*

## शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत करा-प्रकाश उजगरे



बीड (प्रतिनिधी):- वडवणी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कष्टाने उभे केलेली पिके पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. शासन मात्र अजूनही पंचनाम्याच्या नावाखाली वेळकाढूपणा करत असल्याने शेतकरी संतप्त आहेत.

या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते प्रकाश उजगरे यांनी अतिवृष्टीग्रस्त भागांचा पाहणी दौरा करून गावोगावी बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या ऐकल्या. शेतकऱ्यांना धीर देतानाच त्यांच्या न्यायासाठी आघाडी लढा देईल, असा निर्धार व्यक्त केला. या संवाद दौऱ्यात असीम शेख, प्रदीप खळगे, सुरज उजगरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले पान २ वर...

## बप्पा, आपण मुस्लिम समाजा सोबत मारल्या गप्पा :- शेख युनूस



बीड (प्रतिनिधी): बीड जिल्ह्यातील ९९ टक्के मुस्लिम समाज आपल्या सोबत होता.पण तुम्ही त्यांना फक्त आश्वासनाच्या मारल्या गप्पा,पण आपल्याकडून समाजाची खूप आहे अपेक्षा ती आपण पूर्ण करावी.

शहरात दोन-तीन दिवसाच्या पावसामुळे हाहाकार माजून मोमीनपुरा, बालेपिर परिसरात गोरगरिबांच्या घरात पाणी शिरले होते. आणि आपण शहरात दोन दिवस असून सुद्धा त्या भागातील गोरगरीब जनतेला भेटायला सुद्धा गेला नाहीत. ही खूप मोठी खंत आहे. ज्या मुस्लिम समाजाच्या लोकांनी कामे धंदे सोडून आपल्यासाठी जीवाचे रान केले.त्या समाजाला आपण विसरण्याचे काम आपण करीत आहात.

साहेब नियमानुसार रेल्वे बोर्ड वर उर्दू भाषेत नाव पान २ वर...

## तेली समाज दांडिया महोत्सवाचे माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब याच्या हस्ते मंगळवारी होणार उद्घाटन




परळी (प्रतिनिधी):- परळीत दि. २१ सप्टेंबर रोजी तेली समाज बांधव याच्या कडुन दांडिया नवरात्रोत्सव निमित्त सार्वजनिक दांडीया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून मंगळवारी (ता.२३) राज्याचे मा. कृषीमंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब, याच्या हस्ते उद्घाटन असून यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये युवानेते अजय मुंडे, दिव्यांग मंत्राचे उपाध्यक्ष डॉ, संतोष मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, भगतसिंग युवा मंच राष्ट्रीय अध्यक्ष सचिन मुरकुटे, उपशिक्षण अधिकारी परभणी संतोष कटाळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत राहणार आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित रहावे असे आव्हान तेली समाज सार्वजनिक दांडी उत्सव समितीचे आयोजक युवा नेते पवन फुटके, यांनी केले आहे. परळी येथील प्रभू वैजनाथच्या मंदिराच्या पायथ्याशी असलेले श्री शनी मंदिरात तेली समाजाच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे पान २ वर...

## कास पठाराच्या रंगीबेरंगी माळावर बीडचा डंका

### सातारा मॅरेथॉनमध्ये सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकांची लयलूट



बीड (प्रतिनिधी) पावसाळ्यात फुललेले कास पठार! डोंगररांगांवर पसरलेली फुलांची उधळण आणि निसर्गाच्या सहवासात धावण्याचा अद्वितीय अनुभव... अशा रम्य वातावरणात पार पडलेल्या सातारा हाफ हिल मॅरेथॉन या देशातील सर्वांत खडतर मानल्या जाणाऱ्या स्पर्धेत बीडच्या तब्बल ५० धावपटूंनी दणक्यात सहभाग नोंदवत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकांची लयलूट करत आपली छाप सोडली. २१ किलोमीटर अंतराची पान २ वर...

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्या वतीने

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गायरान धारकांच्या न्याय व हक्कासाठी भव्य महाधरणे आंदोलन



केज (प्रतिनिधी):- कानडीमाळी (येवता जि.प. सर्कल) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-)चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले साहेब यांच्या आदेशाने युवा रिपाइंचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष आणि बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २३ सप्टेंबर रोजी गायरान धारकांच्या न्याय व हक्कासाठी भव्य महाधरणे आंदोलन आयोजित केले आहे.

या धरणे आंदोलनात, सन १९९० च्या शासन परिपत्रकानुसार गायरान धारकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहिन गायरान धारक, शेतमजुर व ऊसतोड कामगार यांना प्रतिमाह रु.३ हजार पेन्शन (मानधन) लागु करण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उतारा क्षेत्रावर असणारे पोटखराब क्षेत्र काढण्यात यावे. या मागण्याचा समावेश आहे. पप्पू कागदे यांच्या खांद्याला खांदा लावून आंदोलन यशस्वी पान २ वर...

## रविवारी बीड येथे होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्यास लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे-सत्संग मुंडे

### *माजलगाव येथे ॲड.सुभाष राऊत यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी समाजाची बैठक संपन्न*



माजलगाव (प्रतिनिधी):- राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजासाठी ओबीसीकरणाचा मार्ग खुला करून दिला आहे. यामुळे ओबीसी प्रवर्गावर मोठा अन्याय होत असून राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात देशाचे ओबीसी नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांनी रणसिंग फुंकले आहे. काही झाले तरी ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. यासाठी ना.भुजबळ यांनी लढा उभारला आहे. त्याचाच एक भाग म्हणून बीड येथे रविवार दि. २८ सप्टेंबर २०५ रोजी ना.छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ओबीसी समाजातील मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा आयोजित केला असून या मेळाव्यास जिल्ह्यातील ओबीसी बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले पान २ वर...

## गेवराई बाजार समितीच्या सभापतीपदी जगन्नाथ काळे व उपसभापतीपदी श्रीमती लक्ष्मीबाई पवार यांची निवड

### माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी साधला सामाजिक समतोल




गेवराई (प्रतिनिधी) गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी जगन्नाथ काळे आणि उपसभापती सौ. लक्ष्मीबाई पवार यांची निवड करण्यात आली असून माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी सामाजिक समतोल साधत धनगर समाजालाला न्याय दिला आहे. यावेळी धनगर समाजाच्या वतीने आ. विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी सभापती मुजिब पठाण, कुमारराव ढाकणे, माजी उपसभापती विकास सानप, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, संभाजीराव पवळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मराठवाड्यातील आग्रगण्य बाजार समिती म्हणून गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजिब पठाण आणि उपसभापती विकास सानप यांनी कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर आपल्या पदाचे राजीनामे दिल्यामुळे रिक्त झालेल्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक घेण्यात आली. यावेळी सर्व संचालक व निवडणूक निर्णय अधिकारी सहाय्यक निबंधक दिपक पवळ हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापती जगन्नाथ काळे आणि उपसभापती श्रीहरी पवार यांचा सत्कार करण्यात आला.

सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला ---अमरसिंह पंडित

ग्रामीण भागाण चांगल्या प्रकारे काम करणाऱ्या आणि सर्व सामान्य तसेच विविध जाती धर्मातील कार्यकर्त्यांला पदावर सन्मान करण्याची आपली भुमिका आहे, आणि त्यात कसलाही किंतू परंतु नाही. सर्वांना विश्वासात घेऊन आपण ही निवड केली आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समिती ही पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT